# मुंबई जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

१३ वा मजला, माझगाव कोर्ट
नेसबित रोड, सरदार बलवंत सिंग धोडी मार्ग
माझगाव, मुंबई– ४०० ०१०
ईमेल आयडी:dlsamumbai@yahoo.in

(सचिव)
अनंत कि. देशमुख

---

जावक क्र. 1302 / २०२४
डि.एल.एस.ए., मुंबई
दिनांक. १४/१०/२०२४

प्रति,
मा.प्रधान न्यायाधीश,
नगर दिवाणी व सत्र न्यायालय तथा
मा. अध्यक्ष,
मुंबई जिल्हा विधि सेवा प्राधिकरण,
मुंबई शहर.

**विषय : मुंबई जिल्हा विधि सेवा प्राधिकरण आस्थापनेवर अधिक्षक मिळणेबाबत.**

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणास सविनय सादर करण्यात येते की, मुंबई जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाच्या आस्थापनेवर श्री.हरिश्चंद्र लाड हे अधिक्षक वेतन श्रेणी S-14 (38600-122800) या पदावर कार्यरत होते. ते दिनांक **३०.०४.२०२३** रोजी सेवानिवृत्त झाले. मुंबई जिल्हा विधि सेवा प्राधिकरण हे मा.महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार खालील उपक्रम राबविते.

| | |
|---|---|
| १. | राष्ट्रीय लोक अदालत |
| २. | मध्यस्ती केंद्र |
| ३. | Pre Institution Mediation Under Section 12 A of Commercial Courts Act, 2015 |
| ४. | लोक अभिरक्षक कार्यालय |
| ५. | स्थायी लोक न्यायालय |
| ६. | कायदे विषयक जनजागृती |
| ७. | मोफत वकील पुरविणे |
| ८. | मुंबई जिल्हा विधि सेवा प्राधिकरण आस्थापना |

उपरोक्त यादी पाहिली असता हे दिसून येते की, प्राधिकरणाचे कार्य हे विस्तारलेले असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एका अधिक्षकाची नितांत आवश्यकता आहे. प्राधिकरणाकडून वेगवेगळया पदांवर अनुभव नसलेले कर्मचारी घेतले जातात. त्यामुळे वरील वेगवेगळया उपक्रमाचे काम करित असताना अडचणी निर्माण होतात. अश्या परिस्थितीमध्ये मुंबई जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे कामकाज सुरळितपणे करण्याकरिता प्रतिनियुक्ती तत्वावर एक अधिक्षक मिळाल्यास कामकाज करणे सोईचे होईल.

तरी आपणास नम्र विनंती करण्यात येते की, मुंबई जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाच्या आस्थापनेवर अधिक्षक वेतन श्रेणी S-14 (38600-122800) या पदावर नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुख्य न्याय दंडाधिकारी मुंबई, लघुवाद न्यायालय मुंबई अथवा मुंबई शहरातील इतर कोणीही इच्छुक/पात्र व्यक्ती प्रतिनियुक्ती तत्वावर देण्यात यावी.

आपला विश्वासू,

14/10/2024

(अनंत देशमुख)
सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

Secretary
Mumbai District Legal Services
Authority, Mumbai